● शनिवार, दि. २ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०० वा ● किंमत २ रुपये ● पाने ४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मनसेच्या 'खळखट्याक' अथवा शिवसेनेचे मराठी धोरण पुन्हा अवलंबण्याची गरज

## अमराठी कडुन मराठ्यांना महाराष्ट्रात नाहक त्रास; सहन का करायचा?

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा म्हणतात, मात्र, या आनंदात विरजन टाकण्याचे काम अमराठी लोकांकडून जाणूनबुजून करण्यात येत असून या अमराठी लोकांच्या विरोधात मनसेच्या खळखट्याक सह शिवसेनेचे मराठी धोरण पुन्हा एकदा अवलंबण्याची गरज निर्माण झाली आहे. अमराठी लोकांकडुन महाराष्ट्रात राहणाऱ्या मराठी लोकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून हा त्रास का सहन करायचा असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

दिवाळी सणानिमित्ताने तालुका जालना पोलीस ठाणे हद्दीतील पुष्पक नगर भागात एक मराठी कुटुंबिय पुजा पाठ करुन रात्री आठ वाजेच्या दरम्यान सहपरिवार फटाके फोडत होते. दरम्यान त्यांच्या बाजुला असलेल्या एका अमराठी परिवाराच्या घरावरील आकाश दिवा जळत असल्याचे दिसून आल्याने या मराठी परिवाराकडून संबंधितांना कळवून विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला केवळ प्रयत्न म्हणता येणार नाही तर मोठी आग लागून काही दुर्घटना होण्या अगोदरच टाळण्यात आली, असे असले तरी या अमराठी कुटुंबियांनी नाहक शिवीगाळ करत थेट धमकीच मराठी परिवाराला दिली. मुळात दिवाळी निमित्ताने सर्वत्र फटाक्यांची आतीषबाजी सुरु आहे. पुष्पकनगर भागातही फटाक्यांची आतीषबाजी सुरु होती. नेमके कोणत्या किंवा कुणाच्या फटाक्यामुळे या अमराठी घरावरील आकाश दिवा पेटला हे स्पष्ट करता येणार नसले तरी, ज्या मराठी कुटुंबियांना या अमराठी परिवाराने धमक्यासह शिव्यांची लाखोली घातली, त्यांच्या फटाक्यांमुळे हा आकाशदिव्याल कोणताही धोका पोहचला नाही. याचे कारण म्हणजे मराठी परिवाराने पुजा पाठ केल्यानंतर फटाके वाजविण्यास सुरुवात करतेवेळी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले होते. या रेकॉडिंग मध्ये या बाबी स्पष्ट होतात. असे असले तरी केवळ महाराष्ट्रातील मराठी माणसांना कमी लेखत त्यांना हीन दर्जाची वागणूक देण्याच्या दृष्टिने केवळ आणि केवळ विनाकारण जोराजोरात ओरडणे, आणि धमकावणे, म्हणे 'मैं भी फटाके बजाता तुम्हारे घर के सामने कुछ जला तो बोलना नहीं, मेरे को भी जलना आता हैं', आता ही काय भाषा झाली का? फटाक्यामुळे आकाशदिव्याने पेट धरला मोठी दुर्घटना होण्यापुर्वी टळली. मराठी परिवार त्यांना सांगतोय की आग विझविली. तर हा अमराठी ओरडत म्हणतो 'मैं बजाता यहाँ फटाका और जलता तुम्हारा क्या जलाने का?' कुणाच्या फटाक्यामुळे आग लागली याची शहानिशा करायची साधी गरजही या अमराठी लोकांना वाटली नाही. या अमराठी लोकांना साधे शेजारधर्म काय असतो हे सुद्धा कळत नाही. असो, त्यांच्या शेजारधर्माची मराठी लोकांना तशी गरज नाही. मात्र, मराठी म्हणून शेजारधर्म पाळण्यात महाराष्ट्रीयीन सदा अग्रेसर असतात हे या निमित्ताने अधोरेखित होते. यांच्या सारख्या कुचक्या प्रवृत्तीच्या अमराठी लोकांसाठी खरे तर मनसेच्या खळखट्याक आणि शिवसेनेचे मराठी धोरण पुन्हा महाराष्ट्रात अवलंबवण्याची आवश्यकता असल्याचे दिसून येत आहे.

जालना तालुका पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या या प्रकाराबाबत मराठी परिवाराने माणुसकी म्हणून तक्रार करण्याच्या भानगडीत न पडता शेजारधर्म पाळत मराठी किंवा अमराठी न करता घडलेल्या घटनेवर काही झालेच नाही अशा पद्धतीने पडदा टाकला मात्र, एमआयडीसीत काम करण्याच्या उद्देशाने आलेल्या आणि येथेच स्थायीक होत असलेल्या या अमराठी मद्यपान करुन त्रास देणाऱ्या या अमराठी कुचक्या प्रवृत्तीच्या लोकांकडून या मराठी जणांना भविष्यातही त्रास होण्याची शक्यता असल्याने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.



### बाजार फुलला ...

दीपावली सणानिमीत्त शहरातील बाजार फुलला आहे. बाजारात नवचैतन्य निर्माण झाले असून पुजा-पाठ साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी झाली. झंडूच्या फुलांचाही दिवाळी सणाला मान असून फुल खरेदी करतांना नागरिक दिसत आहेत. (छाया - जावेद तंबोली)

# रायगडावर दिवाळी!

## वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र व इतिहास प्रबोधन संस्थेचा उपक्रम



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** प्रबोधन संस्थेच्या सचिव भारती साठे यांनी केलेला संकल्प होता. त्यानुसार त्यांनी संस्थेच्या सर्व नावीन्यपूर्ण उपक्रमाने शिवाजी महाराजांच्या चारित्र्याचे समाजासमोर प्रकटन करणाऱ्या वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र व इतिहास प्रबोधन संस्थेने या वर्षाची दिवाळी थेट शिवरायांच्या रायगडावरील ३५ कुटुंबांसोबत साजरी केली. या ३५ कुटुंबाना फराळासह विविध वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या. संस्थेच्या या उपक्रमामुळे आणि प्रेमामुळे ही कुटुंबे चांगलीच भारावली होती.

दुर्ग साल्हेर देखभालीसाठी घेतला जळगाव येथे विश्वातले पहिल्या शिव चरित्र साहित्य संमेलनाचे आयोजन केल्यानंतर इतिहास प्रबोधन संस्थेने दुर्ग साल्हेर हा देखभाल व संशोधनासाठी शासनाकडून घेतला आहे. त्यानुसार किल्ल्यावरील देखभालीसह तेथे संशोधनाचे कार्य सुरू केले आहे.

अशी झाली संकल्पाची पूर्णता शिव चरित्राचे संकलन, प्रकाशन, वितरण, प्रदर्शन, जतन, उत्खनन, अशा विविध रूपात काम करीत असताना जे शिलेदार उन्हाळा, हिवाळा, पावसाळा अशा तिन्ही यांचा होता सहभाग या दुर्ग दुर्गेश्वर रायगडाच्या चमूमध्ये रवींद्र पाटील पाचोरा, भारती साठे यावल, प्राचार्य डॉक्टर राजेंद्र जगदाळे पुणे, राजेश आढाव अकोट, प्रा. सुरेश कोळी, भडगाव यांचा समावेश होता. या अभियानासाठी प्राचार्य वासुदेवराव पाटील, प्राध्यापक दत्ता देशमुख, मधुकर साठे, शंकर जाधव, प्राध्यापक राजेश आढाव, भारती साठे, रवींद्र पाटील, विजय पाटील, विक्रम सिंह बाजी मोहिते, आरोही पाटील पाचोरा, डॉक्टर जोगेंद्रसिंह बिसेन, शंकर अहिरे, रोशनी शिंदे, डॉक्टर दिनेश पाटील, भोळे, प्राचार्य टी आर पाटील, लक्ष्मण कांबळे, पान २ वर

# पार्थ सैनिकी शाळेच्या १७ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजी नगर येथे दिनांक २९ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या शालेय विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत जालना येथील पार्थ सैनिकी शाळेने जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना घवघवीत यश संपादन केले. शाळेतून एकूण १९ विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. यापैकी १७ विद्यार्थ्यांची बालेवाडी पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे ४ ु १०० मी. रिले धावण्याच्या शर्यतीत शाळेने आपले वर्चस्व सिद्ध करताना १४ वर्षे,१७ वर्षे आणि १९ वर्षे या तिन्ही वयोगटात प्रथम क्रमांक मिळवत राज्य स्तरीय स्पर्धे साठी पात्रता मिळविली. तसेच हातोडा फेक मध्ये अनिकेत उबाळे याने प्रथम क्रमांक पटकावला तर तिहेरी उडी मध्ये योगेश शिंदे याने द्वितीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक सतीश गाभूड, सूरज जाधव, अशोक शिंदे, योगेश बावस्कर, ध्यानसिंग यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनिषा टोपे, प्रशासकीय अधिकारी बी.आर. गायकवाड, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर, शाळेचे प्राचार्य मोहन नेहेरे आदींनी अभिनंदन केले.





### शहर वाहतुक शाखेच्या दुर्लक्षामुळे वाहतुकीच्या खोळंब्यात भर...

दिवाळी सणानिमित्ताने बाजारात खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. यामुळे वाहतुक काही प्रमाणात जाम होत आहे. मात्र, जालना शहर वाहतुक शाखेच्या दुर्लक्षामुळे वाहतुकीच्या खोळंब्यात भर पडत आहे. मुख्य बाजारपेठेत मालवाहू गाड्यां सर्रास फिरत असून याकडे शहर वाहतुक शाखेला लक्ष द्यायला वेळ नसल्याचे दिसून येत आहे.

## संपादकीय पान

# लोहपुरुष..!

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थानचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# ऐन दिवाळीमध्ये टेंभुर्णीत विजेची अनियमितता सुरु

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** ऐन दिवाळीच्या तोंडावर टेंभुर्णीत विजेचा अनियमितता,लपंडाव सुरू आहे. दिवसातून कित्येकवेळा वीज गुल होत आहे. याशिवाय रात्रीही बराचवेळ वीज जाते. यामुळे ग्रामस्थांना दिवाळीसारख्या सणालाही अंधारात राहावे लागत आहे. त्यातच भर म्हणून येथील बिलालनगर भागातील रोहित्र जळाल्याने या भागातील ग्रामस्थ दोन दिवसांपासून अंधारात आहेत. दरम्यान, विजेचा हा लपंडाव त्वरित बंद करावा, अन्यथा महावितरणविरुद्ध तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्राम स्थांनी दिला आहे.

मागील आठवड्यापासून गावात विजेचा लपंडाव सुरू आहे. सध्या ऑक्टोबर हिट असल्यामुळे ग्रामस्थ उकाड्यात न्हाऊन निघत आहेत. त्यातच गावात डासांची संख्याही प्रचंड वाढल्याने नागरिकांना वीज नसताना मोठ्या समस्यांचा सामना करावा. वीस हजार लोकसंख्येच्या या गावात नेहमीच विजेचा लपंडाव सुरू असतो. याकडे महावितरण जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

दरम्यान, सणासुदीच्या काळात होणाऱ्या विजेच्या लपंडावाला ग्रामस्थ जाम वैतागले असून, याविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी महावितरणला दिला आहे. लागत आहे. येथील बिलालनगर भागातील रोहित्र दोन दिवसांपूर्वी जळाले आहे. हे रोहित त्वरित दुरुस्त करण्यात आल्यानंतर ते लगेच पुन्हा नादुरुस्त झाले. त्यामुळे या भागातील वीजपुरवठा दोन दिवसांपासून खंडित झाला आहे. आंबेगाव रोडवरील वीज गेल्या दोन दिवसांपासून गुल झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# पं. आनंद भाटे यांच्या सुश्राव्य गायनाने जालनेकर रसिकांची मने जिंकली

**जालना । प्रतिनिधी -** संस्कृती मंच जालनातर्फे मागील १६ वर्षांपासून दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा ३० ऑक्टोबर रोजी मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृहात पहाटे सहा वाजता पार पडलेल्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेते, विख्यात गायक पंडित आनंद भाटे यांच्या सुश्राव्य गायनाने जालनेकर रसिकांची मने जिंकली.

संगीतमय मैफलीचा आरंभ पंचतुंड या सुप्रसिद्ध नांदिने झाला. यानंतर दे हाता या शरणागता, प्रिये पहा, राधा धर् मधूमिलिंद तसेच पं.भीमसेन जोशी यांच्या मियां की तोडी रागा मधील दोन बंदिशी सादर केल्या. भजन राम का गुण गाण करिये व भजनशृंखलामध्ये इंद्रायणी काठी, कानडा राजा पंढरीचा, आता कोठे धावे मन, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा सादर करीत रसिक श्रोत्यांची मने जिंकली. मैफलीची सांगता जो भजे हरि को सदा भैरवीने झाली. सुप्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांनी अभ्यासपूर्ण व दमदार निवेदन केले तर प्रशांत पांडव, सुयोग कुंडलकर, गोपाल खोमणे व ललित चौबे यांची संगीत साथ केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय देशपांडे यांनी तर आभार गिरीश राखे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्कृती मंचच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.




# टेंभुर्णीत पोलिसांनी केले पथसंचलन; निवडणूक शांततेत पार पाडण्याचे आवाहन

**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी परिसरामध्ये बुधवारी ( विधानसभा मतदारसंघातील निवडणूक शांततेत पार पडण्यासह कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस व जवानांच्या वतीने अनेक गावात पथसंचलन करण्यात आले.

नागरिकांनी पथसंचलन पाण्यासाठी गर्दी केली होती. पोलीस व जवानांच्या वतीने टेंभुर्णी येथील सहायक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्यावतीने पथसंचलन करण्यात आले. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांनी शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी पोलिसांच्यावतीने करण्यात आले. विधानसभा निवडणूक आचारसहितेचे सर्वांनी पालन करण्याच्या सूचना यावेळी पोलिस प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्याा. सध्या स्थितीत आचारसंहिता चालू आहे, त्याचबरोबर सणासुदीचे दिवस असून गर्दी वाढत आहे अशा वेळेस नागरिकांनी सतर्क रहावे अशा सूचना टेंभुर्णीच्या पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांबळे यांनी नागरिकांना आवाहन केले असून सूचना केले आहे.

यावेळी पोलिस उपनिरीक्षक रवी देशमाने, पोलिस कर्मचारी गजेंद्र भुतेकर, राजेंद्र डोईफोडे, सचिन तिडके, गवळी, उपस्थित होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघाच्या छाननीमध्ये उमेदवारांचे ९१ अर्ज अवैध

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर (अ.जा.) आणि १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघातून निवडणुकीसाठी २५८ उमेदवारांनी ३८२ नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. यापैकी बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत उमेदवाराचे ९१ अर्ज अवैध ठरले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

छाननी प्रक्रियेत ९९-परतूर विधानसभा मतदार संघातील १८, १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघातील १२, १०१-जालना विधानसभा मतदार संघातील १३, १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील ३० आणि १०३- भोकरदन विधानसभा मतदार संघातील १८ नामनिर्देशन अर्ज अवैध ठरले आहेत. उमेदवारांना सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत आपले उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. विधानसभा मतदारसंघ निवडणुकीचा निकाल शनिवार, दि. २३ नाव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात एकुण १६ लाख ५२ हजार ५११ मतदार

## जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. या पार्श्वभूमिवर दि.१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम यादीनुसार जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात पुरुष ८ लाख ६० हजार, स्त्री ७ लाख ९२ हजार आणि तृतीयपंथी ४२ मतदार अशी जिल्ह्यात अंतिम एकुण १६ लाख ५२ हजार ५११ मतदारांची संख्या आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

दि.१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात सैन्य दलातील पुरुष १ हजार ५३१ तर स्त्री ३१ असे एकुण १ हजार ५६२ मतदार आहेत. जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात १८ ते १९ वयोगटातील पुरुष २५ हजार ४८९ तर स्त्री १५ हजार ५६५ आणि तृतीयपंथी २ असे एकुण ४१ हजार ५६ उमेदवार आहेत. जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात पुरुष ८ हजार १८७ व स्त्री ५ हजार ४६५ असे एकुण १३ हजार ६५२ दिव्यांग मतदार आहेत. तर वय वर्षे ८५ पेक्षा अधिक असलेले एकुण २७ हजार २८७ मतदार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील मतदार संघातील मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे तसेच ज्या ठिकाणी १५०० पेक्षा जास्त मतदार संख्या असलेल्या मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात येवून नवीन मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत. यानुसार जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात एकुण १७५५ मतदान केंद्र आहेत.



## पान १ वरुन

पान १ वरुन

### रायगडावर दिवाळी ...

विनोद रायपुरे,दीपेश शाह पुणे, सतीश शिंदे पाचोरा, डॉ. केतकी पाटील जळगाव यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले.

सर्व सदस्यांनी त्यास मान्यता देत यासाठी लागणारा आर्थिक भार उचलला. कोणी रोख पैसे दिलेत, तर कोणी वस्तू दिल्यात. तर कोणी फराळ दिला. या सर्व वस्तू घेऊन संस्थेचे विश्वस्त प्रा. रवींद्र पाटील, सचिव भारती साठे व इतर सदस्य अशी टीम रायगडावर रवाना झाली. तेथील ३५ कुटुंबांना एकत्र करून त्यांना हे सर्व साहित्य देत त्यांच्यासमवेत दिवाळी साजरी करण्यात आली..

ऋतूंमध्ये रायगडावरच्या वस्तूंचे रक्षण करीत आहेत, अशा रायगडावरील ३५ कुटुंबांसमवेत साजरी करण्याचा यंदाची दिवाळी संकल्प इतिहास प्रबोधन संस्था व वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र संस्था इतिहास सदस्यांसमोर हा प्रस्ताव ठेवला. आणि दिवाळी साजरी केली. ज्या ३५ धनगर समाजातील कुटुंबांना ही मदत केली त्यांची नावे पुढीलप्रमाणे, राजेश अवकीरकर, सुदाम अवकीरकर, मनोहर अवकीरकर, सिताराम अवकीरकर, सीताबाई शिंदे, राजू शिंदे, शांताबाई शिंदे, सुनिता शिंदे, रवी अवकीलकर, संजय अवकीरकर, लिलाबाई अवकीरकर, जाईबाई झोरे, सुनील शिंदे, सुलोचना महाबळ, चंद्रकांत गोरे, कुंदा शिंदे, कमल शिंदे, विलास महाबळ, चंद्रकांत रायबा अवकीरकर, महादेव नथू अवकीरकर, किसन अवकीरकर, मोतीराम बाबू अवकीरकर, वसंत शमा अवकीरकर, मोतीराम धावू अवकीरकर, संदीप विठ्ठल आवकीरकर, मोतीराम अवकीरकर, बापू भागोजी अवकीरकर, संतोष शिंदे, सुरेश भागू जी अवकीरकर, बापू अवकीरकर, सुरेश अवकीरकर, पुढील संकल्प संस्थेच्या वतीने करण्यात आला. डिसेंबर मध्ये सर्वत्र थंडी असते आणि या थंडीमध्ये डोंगरदऱ्यात राहणाऱ्या, लोकांना थंडीपासून संरक्षण मिळावे म्हणून पांघरून संकल्प करण्यात आला आहे. असे सामाजिक संकल्प संस्थेच्या वतीने करण्यात येणार आहे. प्रत्येक महिन्याला वेगवेगळे संकल्प करून किल्ले, ऐतिहासिक वारसा, ऐतिहासिक स्थळे, जतन कसे होतील याकडे संस्थेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. संस्थेच्या सर्व संचालकांनी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी संस्थेवर प्रेम करणाऱ्या सर्व विश्वस्तांनी या संकल्पनेत भाग घेण्याचं ठरवलेलं आहे. महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक संस्थांच्या माध्यमातून काम करणाऱ्या या दोन संस्था असून यापुढेही चांगले उपक्रम राबवण्याचा मानस आहे असे संस्थेच्या उपप्राचार्य प्रा.हरी देशमुख वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र, प्रांत उपाध्यक्ष यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.


**आमचे सर्व सभासद, भागधारक व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**

**देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, जालना**

**३१ मार्च २०२४ची सांपत्तीक स्थिती**

| | | | अंक लाखात |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ९८१.६६ | नफा | ४८०.०१ |
| ठेवी | ३१८४८.४७ | गुंतवणूक | २६२६.६२ |
| कर्ज | २४७४१.९४ | एन.पी.ए. | ०.१४% |
| स्वनिधी | ५१६९.२० | सभासद संख्या | ६५१७१ |
| सी.डी.रेषो | ६६.४८% | | |

**संस्थेमार्फत राबविण्यात आलेले सामाजिक उपक्रम**

* संस्थेच्या गरजू सभासद शेतकऱ्यांना सहवेदना योजने अंतर्गत मोफत बि-बियाणे वाटप.
* पतसंस्थेमार्फत सामाजिक बांधीलकी म्हणून संस्थेच्या ज्येष्ठ नागरिक सभासदांच्या आरोग्यांची काळजी घ्यावी म्हणून आरोग्य वर्धिनी योजना राबविण्यात येते.
* संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते.
* दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी चारा-छावणी
* कोरोना आपत्तीच्या काळात सुमाने २००० कुटुंबांना धान्य किटचे वाटप
* मास्क, सॅनिटाईझर, हॅण्डग्लोव्हज इ.चे वाटप
* कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी घरपोच ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटरची व्यवस्था
* कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी विलगीकरण कक्षाची सुविधा
* संस्थेमार्फत विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम
* स्वच्छ भारत अभियानातंर्गत सर्व शाखेमार्फत उपक्रम
* अंबड आणि जालना शहरामध्ये समाजातील सर्व थरातील लोकांसाठी स्वर्गरथ उपलब्ध करुन देण्यात येतो.

संस्थेच्या कार्यान्वित शाखा

**मुख्य कार्यालय जालना**

१ जांलना शाखा, २. रांजणी, ३. घनसावंगी, ४. छत्रपती संभाजीनगर शहर, ५. सिल्लोड (छ. संभाजी नगर) ६ करमाड (छत्रपती संभाजी नगर)

**अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ**

**देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत जालना मो. ९१११२२१४०९९**

पत्ता : टाऊन हॉल जवळ, कचेरी रोड, जुना जालना. **Web : devgiripatsansthajalna.com**


दिपावली
निमित्त आपणास व
आपल्या परिवारास
मंगलमय शुभेच्छा...!
शिवसेना
मा.श्री.प्रल्हादराव बोराडे
मा.सभापती-कृ.उ.बा.समिती,मंठा
संचालक-कृ.उ.बा.समिती,मंठा
उदयसिंह प्रल्हादराव बोराडे
शिवसेना तालुका प्रमुख,मंठा
नगरसेवक नगर पंचायत,मंठा तथा
अध्यक्ष-शिवमुद्रा प्रतिष्ठण महाराष्ट्र राज्य
योगेश गणगे
युवा सेना उप जिल्हाप्रमुख,जालना
जनार्दन काकडे
किसान सेना उप जिल्हाप्रमुख,जालना
नितीन मोरे
दलित आघाडी उप जिल्हाप्रमुख,जालना
कासाबाई शिरगुळे
महिला आघाडी उप जिल्हाप्रमुख,जालना
सुनिता देशमुख
महिला आघाडी तालुका प्रमुख,मंठा
रामराव वरकड
उप.तालुका प्रमुख,मंठा
विलास राठोड
उप.तालुका प्रमुख,मंठा
भिमराव वाघ
उप.तालुका प्रमुख
पांडुरंग बोराडे
शहरप्रमुख,मंठा
दिलीप हिवाळे
दलित तालुका प्रमुख,मंठा
चांद पठाण
अल्पसंख्या तालुका प्रमुख,मंठा
सतिष देशमुख
शिवउद्योग आघाडी ता.प्र.मंठा
भानुदास डाकुरे
किसान सेना तालुका प्रमुख,मंठा
दत्तात्र्य बोराडे
उप.शहरप्रमुख,मंठा
अमोल विरकर
उप.शहरप्रमुख,मंठा
दिपक गायकवाड
युवासेना तालुका प्रमुख,मंठा
विजय चव्हाण
युवासेना उप.तालुका प्रमुख,मंठा
लिंबाजी बोराडे
युवासेना उप तालुका प्रमुख,मंठा
विनोद प्रधान
युवासेना उप तालुकाप्रमुख
महादेव उंकडे
युवासेना उप तालुकाप्रमुख
ॲड.राजेश खरात
युवासेना शहर प्रमुख
कैलास बनकर
युवासेना उपशहर प्रमुख
पिराजी पवळे
युवासेना उपतालुका प्रमुख,मंठा
विलास बनसोडे
युवासेना उपशहर प्रमुख
सर्जेराव मोरे
उपशहर प्रमुख,मंठा
माऊली वायाळ
सर्कल प्रमुख (खोराड सांवगी)
विनोद खरात
पाटोदा सर्कल प्रमुख
नंदु मामा जाधव
तळणी सर्कल प्रमुख
समाधान शेवाळे
तळणी उपसर्कल प्रमुख
परमेश्वर कुलाल
जयपुर सर्कल प्रमुख
अविनाश चव्हाण
पांगरी गोसावी सर्कलप्रमुख

# जालना शहर महानगरपालिका

प्रशासकीय इमारत, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना. ४३१२०३ कार्यालय संपर्क - ०२४८२-२३०३५०

## स्वच्छतेबाबत जनतेस आवाहन

* आपल्या घरातील निघणारा कचरा हा ओला कचरा व सुका कचरा असा वर्गीकृत करुन घंटागाडीमध्येच टाकावा. कचरा रस्त्यावर किंवा नालीमध्ये टाकु नये. कचरा इतरत्र टाकल्यामुळे परिसर अस्वच्छ होतो. व नालीमध्ये पाणी तुंबते व डांस, जीवजंतुंची उत्पत्ती होऊन रोगराई पसरते.
* कचरा रस्त्यावर, नालीमध्ये टाकल्यास महानगरपालिकेतर्फे दंडात्मक कार्यवाही केली जाईल.
* शहरात सिंगल युज प्लास्टिक म्हणजेच प्लास्टीकच्या वस्तु ज्या एकल वापर करण्यात येते अशा प्लास्टिक वापरावर बंदी असल्यामुळे कापडी किंवा कागदी पिशव्यांचा वापर करावा. बंदी असलेले प्लास्टिक वापर करण्यात आल्यास दंडात्मक कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.
* आपल्या घरातील कचरा हा घंटागाडीमध्येच वर्गीकृत करुन टाकावा. मिश्र कचरा टाकु नये, तसेच घंटागाडी न येता आल्यास कचरा इतरत्र टाकु नये.
* घराभोवती दुषित पाणी साचु देऊ नये. पाणी साठ्यांचे साधने नियमितपणे पुर्ण झाकुन ठेवावेत. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा या दिवशी घरातील सर्व पाणी साठे रिकामे करुन त्यांच्या आतील बाजु व तळ घासून पुसून स्वच्छ करुन कोरडे करावेत.
* साचलेल्या नाल्या, डबके वाहते करावे व वाहत्या करता न येणाऱ्या पाण्यात आईल, रॉकेल टाकावे.
* आवश्यक ठिकाणी साठलेल्या पाण्यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत गप्पीमासे सोडावेत.
* खिडक्यांना जाळीदार पडदे बसवावेत, डास प्रतिबंधात्मक साधनांचा व मच्छरदानीचा वापर करावा.
* पाण्याचा अपव्यय टाळावा व नळांना तोट्या लावाव्यात तसेच पाण्याची गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## टॅक्स भरणेबाबत जनतेस आवाहन

१. जालना शहर हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांनी आपल्याकडील नळपट्टी व मालमत्तेचा कराचा भरणा करावा.
२. जालना शहर हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांनी अवैधरित्या नळ कनेक्शन घेऊ नये.
३. जालना शहर हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांनी अवैधरित्या घेतलेला नळ कनेक्शन जालना शहर महानगर पालिकामधील पाणी पुरवठा विभागात फीस भरुन वैध करुन घ्यावेत.
४. मार्च २०२५ पुर्वी मालमत्ता कराचा भरणा करावा नसता दंड व व्याजाची आकारणी केली जाईल.

## जाहीर सूचना/नोटीस

**दिपावली २०२२ व दिपावली २०२३ मध्ये विनंती केली होती आता विनंती नाही !**
**अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांवर गुन्हे दाखल होणार !!**

कार्यपद्धती..
१. प्रत्यक्ष पाहणीमध्ये शहरातील सर्वच/बहुतांशी मालमत्ता धारकांकडे नळ कनेक्शन असल्याचे सिद्ध.
२. मागील दोन वर्षाचा वेळ देऊनही मालमत्ता धारक नळ कनेक्शन नियमीत करत नाहीत आता कार्यवाही होणे अटळ.
३. सर्व अनाधिकृत नळ कनेक्शन नियमीत होईपर्यंत जुन्या मालमत्तांना नविन नळ कनेक्शन देणे बंद राहील.

कार्यवाही -
अ) माहे नोव्हेंबर अखेर पर्यंत स्वतःहून मागील दोन वर्षांच्या नळपट्टीसह सर्व आकारणी भरुन नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी तयार असल्याचे या कामाकरीता नियुक्त केलेल्या अभिकर्त्यामार्फत कळवावे.
ब) माहे डिसेंबर पासून सर्वांवर नळ कनेक्शन बंद करुन पाणी चोरीचे व शासकीय मालमत्ता नुकसानीचे गुन्हे दाखल होतील.
क) या करीता महानगर पालिकेने अनाधिकृत नळ कनेक्शनचा शोध घेऊन त्याना नियमित करणे किंवा गुन्हा दाखल करीता साई एजन्सीज, जालना यांची अभिकर्ता म्हणून नेमणूक केली आहे.

नियमित करण्याचा तपशिल

| | |
|---|---|
| १. साल सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांची | रक्कम रु. ५,४००/- एवढी दंड म्हणून |
| २. साल सन २०२४-२५ ची नियमित पाणी पट्टी | रक्कम रु. २,७००/- एवढी |
| ३. रोड दुरुस्ती चार्जेस व इतर | रक्कम रु. १,०००/- एवढी दंड म्हणून |
| ४. प्रशासकीय खर्च | रक्कम रु. ९००/- एवढी |
| | एकूण १०,००० (रु. दहा हजार) |

वरील प्रमाणे पद्धतीचा अवलंक करुन सर्वांनी मुदतीत आपले नळ कनेक्शन नियमित करावे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**जालना शहर महानगरपालिका, जालना.**

युवा आदर्श

## गोडवा ...

शुभ मुहूर्त साडेतीन
दिपावलीचा पाडवा
प्रेम शब्द परवलीचा
नात्यां अपूर्व गोडवा
पत्नीपति चाके दोन
संसार रथाला मढवा
दोन्ही महत्त्व सारखे
का भेद शोधी गाढवा
सुवर्ण अलंकार चोख
अमोल बंधन घडवा
विश्वास मोती माणके
साज लौकिक चढवा
स्पर्श तिचा अमृताचा
माधुर्य आणी लाडवा
नवरोबा होई लाडोबा
चेष्टामस्करीत चिडवा
असोआसवे त्रासदाई
डोळ्यां कडात अडवा
आनंदोत्सव जगायचा
संकटा घाटात नडवा
आपदा विपदा येताचं
गोवर्धन उचले अडवा
क्लिष्ट कठीण प्रसंगी
गुंताळ हळूचं सोडवा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.